www.maharashtratimes.com

मटा+TOI : पुण्यात नंबर १

महाराष्ट्र टाइम्स

पुणे, सोमवार, दि. २० जुलै २०२६

# भरतनाट्यममधून पांडुरंगाची भक्ती

**पुणे** : भरतनाट्यममधून पुणेकरांनी पांडुरंगाची भक्ती अनुभवली. ‘फ्युएल शिक्षण संस्थे’तर्फे ‘माउली - एक कालातीत परंपरा’ हा उत्सव आयोजित करण्यात आला होता. ही कला भरतनाट्यम नृत्यांगना आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाली. कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांनी आपल्या नृत्यातून पांडुरंग आणि भक्त यांच्यातील भावबंध उभा केला. या प्रसंगी फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे, ‘सीईओ’ मयूरी देशपांडे, सचिन अंबर्डेकर, अमित वाजगे, चंद्रशेखर बलरामन उपस्थित होते. सूत्रसंचालन स्मिता कुलकर्णी यांनी केले.